स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

जा.क्र.:कबचौउमवि/१६/ईमेल/२०२४ दिनांक :- ११ नोव्हे., २०२४

**बातमी क्र.१**

जळगाव दि. ११ ( ) राज्यात शिक्षणाची गुणवत्ता राखून सुसूत्रता आणण्यासाठी राज्य शासनाने स्थापन केलेल्या राज्यस्तरीय गुणवत्ता हमी कक्षाचे अध्यक्ष माजी कुलगुरु प्रा.प्रमोद येवले व समिती सदस्यांनी सोमवार दि. ११ नोव्हेंबर रोजी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात दिवसभर बैठक घेऊन विद्यापीठाच्या विकासाची माहिती घेतली.

फेब्रुवारी महिन्यात महाराष्ट्र शासनाने राज्यस्तरीय गुणवत्ता हमी कक्षाची निर्मीती केली. राज्यातील विविध विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालये, विद्यापीठ यामध्ये मान्यता प्राप्त प्राचार्य / प्राध्यापक यांची संख्या समाधानकारक नसल्याने गुणवत्तेवर फरक पडत आहे. तसेच पुरेसे प्राध्यापक नसल्याने परीक्षांच्या निकालास होणारा विलंब, नॅक मूल्यांकन, संशोधन कार्य याबाबत या कक्षाच्या सदस्यांना काही गोष्टी निदर्शनास आल्या व त्या प्रकारच्या काही शिफारसी शासनाकडे सादर केल्या आहेत. या शिफारसींच्या अनुषंगाने राज्यस्तरीय गुणवत्ता हमी कक्षाचे अध्यक्ष व सदस्य हे विद्यापीठांना भेटी देवून विद्यापीठाची माहिती, अडचणी, राबविल्याजाणाऱ्या उत्तम योजना याबाबत माहिती घेत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून दि.११ नोव्हेंबर रोजी या समितीने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात बैठक घेतली.

बैठकीच्या पहिल्या सत्रात विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक प्रा.समीर नारखेडे यांनी विद्यापीठाचा आढावा सादर केला. कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांनी विद्यापीठाविषयी सविस्तर माहिती दिली. यावेळी समितीचे अध्यक्ष व डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरु प्रा.प्रमोद येवेले, समिती सदस्य डॉ.विजय खरे, डॉ.भालचंद्र वायकर, नोडल अधिकारी डॉ. पांडुरंग बरकले हे उपस्थित होते. डॉ.येवले यांनी समितीच्या स्थापनेविषयी माहिती दिली व विद्यापीठांचा आढावा घेतल्यानंतर राज्यशासनाकडे अहवाल सादरकेला जाणार असल्याची माहिती दिली. यावेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील, अधिष्ठाता प्रा.अनिल डोंगरे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा.योगेश पाटील, वित्त व लेखा अधिकारी सीए रवींद्र पाटील, क्रिडा संचालक डॉ.दिनेश पाटील, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ.आशुतोष पाटील उपस्थित होते.

दुपारच्या सत्रात नॅक मानांकन प्राप्त झालेल्या काही निवडक महाविद्यालयांच्या प्राचार्यांसमवेत समितीने चर्चा करुन त्यांना स्वायत्तता स्वीकारण्यासाठी प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य डॉ.जी.के.पटनायक, डॉ.एस.व्ही.पाटील, डॉ.डी.एन.पाटील, डॉ.आय.एल. सौंदाणकर, डॉ.व्ही.ए.रायपुरे, डॉ.एस.के.चौधरी, डॉ.आर.बी.वाघुळदे, डॉ.ए.जे.पाटील, डॉ.वाय.व्ही. पाटील, डॉ.पी.आर.पाटील, विनोद पालेशा, डॉ. प्रभाकर महाले, डॉ.राजेंद्र अहिरे, डॉ.एस.एस.राजपूत, डॉ.संजयकुमार बारी, डॉ.एम.के.पटेल, डॉ.एस.पी.पवार, डॉ.पी.आर.चौधरी, डॉ.राकेश चौधरी, डॉ.डी.ए.सुर्यवंशी, डॉ. एल.बी. पटले हे उपस्थित होते. तर तिसऱ्या सत्रात नॅक मूल्यांकन न केलेल्या निवडक महाविद्यालयांच्या प्राचार्यांसोबत चर्चा केली. यावेळी प्रा.सी.पी.लभाने, डॉ. नितीन इंगळे, प्रा.एस.एन.शिंदे, प्रा. दशरथ पावरा आदी उपस्थित होते.

**बातमी क्र.२**

**जळगाव दि.११ ( ) भारत सरकारचे युवक कल्याण व क्रीडा मंत्रालय आणि रासेयोचे विभागीय संचालनालय पुणे व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठात उद्या दि.१२ नोव्हेंबर पासून पश्चिम विभागीय राष्ट्रीय सेवा योजना पूर्व प्रजासत्ताक दिन पथसंचलन निवड शिबिर होत आहे. १० दिवस चालणाऱ्या या शिबीरात सात राज्यांमधील २०० विद्यार्थी सहभागी होत आहेत.**

महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, तेलंगना, गुजरात, दमन, दादरा-नगरहवेली, गोवा या सात राज्यातील १०० रा.से.यो. विद्यार्थी व १०० रा.से.यो. विद्यार्थिनी असे एकूण २०० रासेयो स्वंयसेवक या १० दिवसीय शिबिरात सहभागी होणार आहेत. याशिवाय दहा संघ व्यवस्थापक देखील सहभागी होतील. उद्या मंगळवार दि. १२

नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४.३० वाजता सिनेट सभागृहात शिबिराचे उदघाटन उत्तराखंड राज्याचे उच्च शिक्षण विभागाचे प्रधान सचिव डॉ. रणजित कुमार सिन्हा यांच्या हस्ते होणार असून कुलगुरू प्रा. व्ही.एल.माहेश्वरी अध्यक्षस्थानी राहतील. यावेळी प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, महाराष्ट्र शासनाचे रा.से.यो.चे राज्य संपर्क अधिकारी डॉ. निलेश पाठक यांची उपस्थिती असणार आहे. त्या आधी दुपारी ३.३० वाजता विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारापासून शोभायात्रा काढण्यात येणार आहे.

या दहा दिवसात रोज सकाळी ९ ते ११.३० व दु. ३ ते ५.३० या कालावधीत पथ संचालनाचा सराव घेतला जाणार आहे. सकाळी योगा, दुपारी गट चर्चा आणि रोज सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रम अशी या शिबिराची दैनंदिनी असणार आहे. या शिबिरातून ५६ विद्यार्थ्यांची दिल्ली येथील प्रजासत्ताक दिन पथसंचलनासाठी निवड होणार आहे. या शिबिरासाठी भारत सरकारच्या युवक कल्याण व क्रीडा मंत्रालयाने सहकार्य केलेले आहे अशी माहिती रासेयो प्रादेशिक संचालक अजय शिंदे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील व रा.से.यो. संचालक डॉ. सचिन नांद्रे यांनी दिली.

.........................................................................................................

**जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बा**तमी/२०२४ दिनांक: ११ नोव्हेंबर, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी